भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-१२/०८/२०१७

# प्रेसनोट

## घरफोडी चोरी करणारा पाहीजे आरोपी अटकेत

भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

भारती विदयापीठ पोलीस ठाणे हददीत होणारे घरफोडयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे आदेशावरुन पोलीस ठाणे हददीत पो.उप-निरी शिवदास गायकवाड हे त्यांचे पथकासह पेट्रोलींग करीत असताना पोलिस **कर्मचारी प्रदीप गुरव व विनोद भंडलकर** यांना त्यांचे खास बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,गोकुळनगर चौकातील पानाचे टपरीजवळ घरफोडी चोरी करणारा पाहीजे आरोपी अक्षय खंडाळे हा उभा आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी ताबडतोब सदरची माहीती श्री कमलाकर ताकवले सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो व राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे) भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळवून बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन वॉच केला असता बातमीत मिळालेले ठिकाणी बातमीतील इसम थांबला असल्याचे दिसल्याने बातमीप्रमाणे स्टाफचे मदतीने त्यांस जागीच पकडुन त्यांस आहे त्या स्थितीत ठेवुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव पत्ता अक्षय बापु खंडाळे वय.२२ वर्ष रा. शेलार चाळ शेलारमळा कात्रज तलावाशेजारी कात्रज पुणे असे सांगितल्याने त्यास ताब्यात घेवून त्यांचेकडे अधिक तपास करता त्यांने घरफोडीचे गुन्हे केल्याचे कबुल केल्याने अधिक तपासात त्यांचेकडून एकूण ७० ग्रॅम सोन्याचे दागिने असा २,१०,०००/- चा माल जप्त केला आहे.

तसेच १५ दिवसापुर्वी अटकेतील आरोपीचे साथीदारनामे १). दिपक उत्तम डाखोरे वय.१९ वर्ष रा.हनुमानचाळ राजीव गांधीनगर अप्पर इंदीरानगर बिबवेवाडी पुणे २)विकास दत्तात्रय कापसे वय.२० वर्ष रा. श्रेयसनगर अप्पर इंदीरानगर बसडेपो समोर बिबवेवाडी पुणे यास अटक करून त्यांचेकडून **भारती विद्यापिठ पोलीस ठाणेकडील घरफोडीचे दहा गुन्हे उघडकीस आणले** असून दोन लॅपटॉप व चार मोबाईल हॅन्डसेट व १०० ग्रॅम सोन्याचे दागिने असा ३,७१,०००/- चा माल जप्त करण्यात आलेला आहे.**सदर आरोपीकडून आतापर्यंत ५,८१,०००/- चा मुद्देमाल जप्त करण्यात भारती विद्यापिठ पोलीस स्टेशनचे तपास पथकास यश आलेले आहे.**

सदरचा आरोपी हा घरफोडी रेकॉडवरील गुन्हेगार असून त्याचेवर भारती विद्यापिठ येथे घरफोडीचे गुन्हे दाखल असून बिबवेवाडी पो.ठाणे येथील गुन्हयामध्ये देखील तो पाहीजे आहे.दाखल गुन्हयाचा पुढील तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो, अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, मा.श्री डॉ.प्रविण मुंढे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री कमलाकर ताकवले सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड, पो.उप-निरीक्षक श्री.भोलेनाथ अहिवळे पोलीस कर्मचारी प्रदीप गुरव, विनोद भंडलकर,भिमराव पुरी, गणेश सुतार, समीर बागसिराज,बाबा नरळे यांचे पथकाने केलेली आहे.**